दिनांक २७/०१/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक भगवान कौतीकराव मगर, वय ५७ वर्षे, पद-वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, कन्नड ता.कन्नड, जि. औरंगाबाद यांनी लाचेची मागणी करून १०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | भगवान कौतीकराव मगर, वय ५७ वर्षे, पद-वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, कन्नड ता.कन्नड, जि. औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी वृक्ष लागवड योजने अंतर्गत रोपांचे, खताचे बील मंजुर करणेची कारवाई करणेसाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | चिंचोली लिंबाजी गांव, खंडोबा मंदीर जवळ, कन्नड, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने शेतकरी आहे. त्यांनी वृक्ष लागवड योजने अंतर्गत केलेल्या लागवडीचे रोपांचे, खताचे बील मंजुर करण्याची कारवाई करणेसाठी तक्रारदार यांच्याकडे श्री. मगर, वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, कन्नड यांनी २०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, भगवान मगर, वनपाल यांनी तक्रारदार यांच्याकडे २,०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती १,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, भगवान कौतीकराव मगर, वय ५७ वर्षे, पद-वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, कन्नड, ता. कन्नड, जि.औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गोपल बंरडवाल, राजेंद्र सिनकर, बाळासाहेब राठोड, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

27/01/2021

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**